Vol. 6 | Special Issue 1 | March 2019

ISSN 2394 - 7632
EISSN 2394 - 7640
Special Issue

# SCHOLARS IMPACT

Quarterly

International Multidisciplinary Multilingual Journal of Contemporary Research

UGC Approved Journal No- 41129

IMPACT FACTOR - 5.98

## Special Issue



✣ EDITOR IN CHIEF ✣

DR. M. RAGHIB DESHMUKH

Issue Editors

Dr. Kalyan Gangarde
Dr. Swati R. Bhise

MAHATMA GANDHI

# CONTENTS


| | Title | Author | Page |
|---|---|---|---|
| 1. | Path Of 'Learning Within' - Understanding 'Fear' and How to Free From it in the Higher Education Scenario: A Gandhian Perspective | Aswathy A | 5 |
| 2. | R. C. Dutt's Thoughts on Taxation and Its Relevance in Present Context | Dr. Ankush L. More | 7 |
| 3. | Influence Of Gandhi On Telugu Theatre | Dr.Bh.Padmapriya | 10 |
| 4. | Teaching Ernest Hemingway: Discoursing the Milieu of Writer and His Craft | Sanjeev Khanna | 12 |
| 5. | Exploring The Gandhian Search For Truth In R.K. Narayan's *The Guide* | Annu Sara Jose | 18 |
| 6. | *Waiting For The Mahatma:* An Archetype Of Gandhian Ideologies | Mantha P.P. | 20 |
| 7. | Gandhian Ideology In Mulk Raj Anand's Untouchable | Anurag Pandey | 23 |
| 8. | Gandhian Philosophy In Raja Rao's Kanthapura | K. R. Donawad | 25 |
| 9. | Gandhian Strain In Indian English Novels | Sumera Subuhi | 27 |
| 10. | Mahatma Gandhi's Role In Ensuring Democracy In India | Dr. Pooja Gupta & Komal Sharma | 29 |
| 11. | Colonising the Pre-Colonial Mind | Dr. L. V. Padmarani Rao | 32 |
| 12. | Philosophy of Mahatma Gandhi -an inspiration | Manzoor Ahmad Wani | 36 |
| 13. | Impact of English Language in India in the Light of Mahatma Gandhi's Views | Dr.Rachna Yadav | 39 |
| 14. | E-Resources And E-Services In Academic Libraries: A Study | Dr. Ashok Kolambikar | 41 |
| 15. | Platonism: A Study | Pandurang D. Mamadge | 43 |
| 16. | Menopause: Symptoms And Remedies | Vaishali Tukaram Lone | 45 |
| 17. | Farmers' Suicides In India; Causes And Remedies | Dr. V. N. Bhopale & Dr. P. D. Suryawanshi | 48 |
| 18. | नक्षलवादी चळवळ : एक अभ्यास | प्रा.जगन्नाथ टोम्पे | 51 |
| 19. | क्रांतिवीर जोतिबा फुलेः वैचारिक वाङ्‌मयाची प्रेरणा | डॉ. सा. द. सोनसळे | 54 |

Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

19.

# क्रांतिवीर जोतिबा फुलेः वैचारिक वाड्.मयाची प्रेरणा

डॉ. सा. द. सोनसळे
सहयोगी प्राध्यापक मराठी
रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि.परभणी

क्रांतीसुर्य क्रांतिबा फुल्यांचे विचार जसे होते तशी त्यांनी कृती केली. त्याच्या विचारांना कृतीची जोड होती. त्याच्या प्रत्येक मागे विचारांचे भक्कम पाठबळ होते. आणि म्हणून त्यांनी लिहिलेल्या साहित्य कृतीला सुध्दा समृध्द विचारांचे पाठबळ होते. त्यांची कोणतीही साहित्यकृती घेतली तरी त्यामध्ये फार मोठा विचाराधार असलेला दिसेल.

१९८० साली पुरागामी सत्य शोधक या त्रेमासिकाच्या अंकात प्रसिध्द झालेले परंतू १८५५ सालीच लिहून पूर्ण झालेला ब्राम्हणी समाज व्यवस्थेचा पर्दाफास करणारे दक्षिणा प्राईज कमिटीस सादर केलेले तृतीय रत्न नावाचे नाटक जोतिबा फुल्यांनी लिहिले. सदरील नाटक लिहिताना त्यांना आपण नाटक लिहित असल्याचे सजग भान होते. पात्रांची ये-जा नाटकातील संघर्ष, नाटकांचे घटना प्रसंग, हया सर्वच बाबी त्यांनी लक्षात घेतलेल्या आहेत. तृतीय रत्न हे नाटक ज्या वेळी जोतीबा फुल्यांनी लिहिले त्या वेळी मराठी नाटक अस्तित्वातच नव्हते. १८८५ नंतर मराठी नाटय चळवळ सुरू झाली. मुदाहून जोतिंबाना डावलण्यासाठी बाम्हणी व्यवस्थेच्या रक्षकांनी जोतिबा फुल्यांच्या नाटकाकडे डोळे झाक केली आणि मराठी नाटकाचे जनक जोतिबा फुले असताना कुण्या भलत्याच देवलांना देवपण दिले. परंतु यामुळे तळ हाताने सूर्य झाकू पाहणा-या लोकांना फार काळ आनंद व्यक्त करता आला नाही. नवे संशोधन झाले आणि क्रांतीबा फुले मराठी नाटकाचे जनक असल्याचे सिध्द झाले.

या नाटकात कुणब्याच्या अज्ञानाबदल त्याच्या शोषणाबदल जोतिबा फुल्यांनी मोठया पोट तिडकीने लिहिते आहे. ब्राम्हणी व्यवस्थेचा बळी ठरलेल्या आणि अज्ञान अंःकाराच्या गर्तेत आयुष्य कंठणा-या दुबळया शेतकरी कुंटुबाबदल त्यांनी लिहिले. शेतक-यांच्या मुलाला ताप येतो आणि त्यासाठी पुरोहितगिरी करणारा ब्राम्हण वर्ग त्या शेतक-याची कशी दिशाभुल करतो आणि त्यातून त्याचे शोषण कसा करतो. याचे बोलके उदाहरण अगदी ओघवत्या भाषेत जोतिबांनी दिले ओहत. मुलाचा ताप कती होण्यासाठी जप अनुष्ठान करावे लागते. म्हणून ब्राम्हणांनी कावेबाजपणा केला. त्यातील काही संवादांचा आधार घेतल्यास लक्षात येईल.

दामुः जप कोण करवित आहे ?
जोशीः तो एक कुणबी आहे.
दामूः किती दविस करविणार आहे ?
जोशीः ते यर्व माझ्या हातात आहे. मी जसे सांगेन तसे तो करील बेटा.
दामुः तर मग आठ दिस लागोपाठ जप करण्याची तजवीज कर म्हणजे माझी धोत्रे फाटली आहेत म्हणून मी दुसरी नवी धोत्रे घेईन परंतू त्याजकडून धोत्रे विकत मात्र आनू नको बरे दादा करण तू रूपये देवीव म्हणजे माझी मीच आपल्या खात्रीची आणीन.
विदूषकः पंरमू दामूच्या मनातले बैठकीतले तबक साजरे करायचे आहे हे बेटा कशाची धोत्रे घेतो हे या जोशास काय ठावे ?

या संवादावरून असे लक्षात येते क ब्राम्हण समाजातील भट भिटूकी करणारे दुबळया मासाला कसे लुबाडत होते. भीक मागण्याची ही जागातील अजब त-हा आहे. पुढे एका ठिकाणी देवाच्या निर्मीती संदर्भीत एक संवाद येतो.

पाद्रीःपाटील बुवा हा तुमचा मारूती देव कशाचा केला आहे ?
बाईचा नवराः यात कशाचा राग, आमचा मारूती दगडाचा केला आहे.
पाद्रीः बरे हा दगड कुठून आणला असावा बरे ?
बाईचा नवराः खाणीतून आणला असावा असे मला वाटते.
पाद्रीः बरे पण ज्या खाणीतून हा धोंडा आणला त्या खाणीत हा एवढाच धोंडा होता काय ?
विदुषकः असे काय तुम्ही वेडयासारखे विचारतां ? आहो सडकेवरजी खडी करून टाकलेली असते, ती त्याच दगडाची नव्हे? आणि त्याच खडीची पुन्हा आपल्या सर्वाच्या पायाखाली तुडविल्याने दरवर्षी माती होत नसते'' १

अशा उद्बोधपर संवादातून दरिद्री आणि भोळया निरक्षर लोकांची कान उघाडणी जोंतिबांनी केली. शेवटी ही शोषीत माणसं ज्ञान घेण्यासाठी शाहेत जाण्याचा विचार करतात. हा विचार आत्मसात करतात. वाड्.मयाचा हा वेगळा पैलू परंतु, त्यातूनही विचारांचाच ओघ असलेला दिसतो.

छत्रपती शिवाजी राजे भोसले यांचा पवाडा यामध्ये जोतिबा फुलेंनी ग्रॅड डफच्या हिस्टरी ऑफ द मराठाज या इंग्रजी पुस्तकाच्या आधार घेतला. शिव छत्रपतीच जन्मापासून जोतिबा आढावा घेतला. त्याच प्रमाणे ग्रॅड डफ आपल्या विवेचनात शिवाजी महाराजचा गुरू संत रामदास मानतो परंतु जोतिबा फुले मात्र ते मानत नाहीत. सदरील पोवाडा रामचंद्र बाळकृष्णाजी राणे आणि मुंबईचे जस्टिस ऑफ दि पीस यांना अर्पण केला. हा पोवाडा १८६९ साली प्रकाशित झाला. त्यात जोतिबांनी पुढील उल्लेख केले ते उल्लेखनीय आहेत.

"म्हार मांग झाले देशोधडी केले ।
ब्राम्हण चिरंजीव झाले ।
देश निक्षत्रिय झाल्यामुळे यवना फावले ।
सर्वास त्याही पिडीले ।।

देशासाठी महारमांगानी आपले प्रार्णापन केले आणि ब्राम्हण मात्र चिरंजीव झाले. परशुरामाने देशाला निक्षत्रीय केल्याने या देशावर यवनांनी आक्रमण केले. त्यामुळे शिवाजी महाराजांनी रयतेचा पैसा रयतेच्या कामी लावला. शिवाजीच्या राज्यात अनेक शूर होते. त्यांनी राज्यवृध्दीसाठी आपले बलिदान दिले. त्यांच्या आठवणीने दु:खी झालेला शिवाजी राजा जोतिबांनी पुढील प्रमाणे चित्रित केला.

"गड हाती लागला. तान्हीजी बळी घेतला.
झाले दुःख शिवाजीला
जेतीराव फुल्यांनी गाईला पुत क्षुद्रांचा
मुख्य धनी पेशव्याचा" ३

टसाच पोवाडा विद्याखात्यातील ब्राम्हण पंतोजी चा जुन १८७९ मध्ये प्रकाशित झला. या निमित्याने जोतिबा म्हातात. सर्व ब्राम्हण पंतोजी या पवाडयात वर्णिल्या प्रमाणे आहेत. असे आमचे मत नाही. तथापी सरकारास जो दोष दिला आहे तो बहुतांशी खरा आहे. ज्या रयतेकडून सरकारी विद्येची पट्टी घेते तिच्या मुलास विद्या शिकविण्यासाठी जशी सोय व्हावी तशी अद्याप झाली नाही. या बाबीला स्पष्ट करण्यासाठी जोतिबा लिहितात.

" त्याचा माल तचे हाल पडल्या पठाणाच्या पंत्ती । मुले ती भलत्याची शिकती ।।
माळी कुणबी शेती खपून करती पट्टीची भरती प. मिळेना लंगोटी पुरती ।। "४ ;पृष्ठ ७७

किंवा त्यांनी ब्राम्हणांचे कसब हे दीर्घ काव्य लिहिले. त्यात ही ब्राम्हणांनी बहुजनाच्या ;मुलांच्या जन्मापासून मृत्यू पर्यंत आणि मृत्यूनंतर कसे छळले त्याचा उत्कृष्ट संदर्भ देतात.

"तगाद्याची तुम्ही वाट पाहू नका
मारा बोंबा हाका जोशा नांवे"
किंवा उत्तम ब्राम्हण जन्म हिंदुस्थानी
दिसे शुद्रावाणी अखंडीत
किंवा

महार समाजाचे वर्णन करताना जोतिबा लिहितात.

दाण्याला रे महागप् पोटाची रे आग
सोई नाही पोट भरण्यास खाती मेल्या जनावरस

एका अभंगात ब्राम्हणांची चालबाजी सांगतात. शुद्रावरी मुल जन्मलेले पाहून

न्याहळुनी सर्व भोळया पित्या वोले
मुळावरी आले बाळ तुझ्या
किंवा

असाच अभंग शुद्राच्या लग्न प्रसंगाचे वर्णन करणारा आहे.

लग्नाच्या आधी मोठी गडबड । धावे दूडदुड दोहीकडे
हाती शस्त्रे देई पाठराखे केले । माम नेमियले परस्पर ।।
वर्ष वय गुण प्रित परस्पर । पहा सारासार तपासूनी।।
ब्राम्हणांचे येथे नाही प्रयोजन । द्यावे हाकलून जोती म्हणे ।।
ब्राम्हण भोजन तूप चळचळ । दक्षिणा तुंबळ आधी बाली ।।
फुकटचे खाती दाटविती नळ । करी मळमळ पाणी पीता ।।
धनी कामगार तोंडाकडे पहाती । शिळा पाक खाती सावकाश विद्याहीन ।। शुद्र पाहून हळूच कसा गाठिता त्याला लागतो पोथ्या वाचायला ।।

हया सर्वच अभंग कावया वरून समाज व्यवस्थेत लुडबूड करणारा आणि ऐत खाउ असणारा ब्राम्हण भटांचा वर्ग अज्ञानीजनास लुबाडून तुपा पोळयांचा जेवण करणरा आणि पोट भरण्यासठी महाग असणारा महार मेलेली जनावरं खातो. शुद्रा घरी बाळ जन्मले तर ते मुळावर आले म्हणून त्यांच्याकडून दक्षिणा घेणारा ब्राम्हण कसा शोषण करतो. त्याचे परखड वर्णन जोतिबा फुलेंनी केले आहे. वाड.मयाचा हा प्रकार ही लोकप्रबोधनासाठी वापरला.

'गुलामगिरी' हा ग्रंथ २४ सप्टेंबर १९७३ साली लिहिला. या ग्रंथात ते म्हणतात. " शुद्रात ईश्वरराचा उत्पन्न करण्याचा हेतू इतकाच आहे की, त्यांनी सदा सर्वदा भट लोकंच्या सेवेत तत्पर असावे व जेणे करून त्यांची मर्जी खुष राहिल असे करावे. म्हणजे ते ईश्वराला पावन होवून त्यांचे देहाचे व जन्मास येण्याचे

सार्थक झाले.'' या पुस्तकात १६ खंड आहेत. त्या प्रत्येक खंडात जोतिबा फुलें आणि धोडिंबा यांनी केलेले संवाद आहेत.

धोडिबाने विचारलेल्या वादग्रस्त प्रश्नांना तर्काच्या कसोटीवर चिकित्सक उत्तरे दिली.

शेतक-यांचा असून हा अतिशय मौलिक ग्रंथ - १८ जुलै १८८३ साली लिहिला. आणि २ जुन १८८६ साली प्रकाशित झाला. या ग्रंथात पाच प्रकरण असून त्या शेतक-याच्या दैनिक स्थितीचे वर्णन केले आहे. यात शेतकछयांची दुबळीस्थिती, त्यांच्या घराचे वास्वत, शेतीचे प्रश्न शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जात वाढतो आणि कर्जात मरतो त्यामुळे शेतक-याचे जीवन सुधारायचे असेल तर त्यांना परदेशात प्रगत शेती दाखविण्यासाठी नेले पाहिजे. त्याना कृषिरत्न पुरस्कार दिले पाहिजेत. अशा सूचना तर केल्याच. परंतु शेतीसाठी लागणारे पाणी जोगजागी अडविले पाहिले शेतक-यांच्या मालाला भाव मिळाला पाहिजे अशा प्रकारचा क्रांतीकारी विचार त्यांनी या ग्रथात मांडला.

ज्योतिबा फुलेंनी पूर्णे सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट लिहिला. ग्राम जोश्याची खबर लिहिली. त्यातही वास्तव आणि वैचारिकता यांचा मिलाप आहे.

सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक १८९१ साली प्रकाशित झाले. ग्राम निर्माण कर्ता कोण आहे त्याच्या संदर्भात विचार मांडले. स्त्री पुरूषाच्या संदर्भाने विचार मांडले आहेत. ते म्हणतात.

सत्य सर्वांचे आदीघर। सर्व धर्माचे माहेर।
जोती प्रार्थी सर्व लोका। व्यर्थ डंभा पेटू नका।

या ग्रंथात बळवंतराव आणि जोतिबा फुले यांच्यातील संवाद, यशवंत आणि जोतिरावामध्ये संवाद आहेत.

जोतिबा फुलेंनी अखंडादि काव्य रचना केली. त्यात त्यांनी मांडले आहे.

''पशुहिंसा आहे अस्सल वेदान्त। पुण्य गौवधांत। धुर्त म्हणे
तरूण शुद्रांनी विद्या संपादावी। चाकरी धरावी पृ शाळ्या खाती ।।
जातीचे ब्राम्हण गर्वे हंबरतो।तोरा मिरविती आम्ही श्रेष्ठ ।।''

ब्राम्हणांचा जाती गर्व त्यांचा आध्यात्मिक आणि धार्मिक दहशतवाद हया अखंडातून मांडला आहे. शुद्रतिशद्र स्त्रियांना जागे करण्यासाठी अखंडाची रचना केली. अस्पृश्यांची कैफियत मांडली. जोतिबांनी इंग्रजी वाङ्मयही लिहिले. त्यांचे उजव्या आणि डाव्या हाताचे हस्ताक्षर अतिशय सुंदर आहे. हे सर्व जरी असले तरी त्यांचे सर्वांवर अतिशय प्रेम होते हे पुढील पंक्तीवरून कळेल.

ख्रिस्त महमद मांग ब्राम्हणाशी। धराचे पोटाशी बंधू परी ।।

**संदर्भ**


१. तृतियरत्न - समग्रवाड.मय
२. कित्ता - पृ.१३,१४,पृ.२१
३. छ. शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडासमग्रवाड.मय
४. कित्ता - पृ.६४
५. कित्ता - पृ.७१
६. ब्राम्हण पंतोजीचा पावाडा पृ.७७
७. ब्राम्हणांचे कसब - समग्रवाड.मय
८. इशारा - समग्रवाड.मय
९. शेतक-याचा असूड - समग्रवाड.मय
१०. पुणे सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट
११. सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक
१२. अखंड
१३. अस्पृश्यांची कैफियत


❑❑❑



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani